# प्रेसनोट

दिनांक– ०६/०७/२०१८.

## ठाणे, वागळे इस्टेट येथील उद्योग उर्जा व कामगार विभागातील विद्युत सहायक निरिक्षकास लाच स्विकारताना अटक.

दिनांक ०६/०७/२०१८ रोजी, वागळे इस्टेट, ठाणे महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभागामधील विद्युत निरीक्षक **रामकृष्ण सीताराम देवकर**, वय ५० यांना तक्रारदार यांच्याकडून ४०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीप्रमाणे

यातील तक्रारदार यांचे कालेहर भिवंडी येथील ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी टोरेंट पॉवरची एनओसी देण्याकरीता वरील नमद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ४०,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ३०,०००/– रुपये देण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन असेबी, ठाणे यांनी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **रामकृष्ण सीताराम देवकर** यांना तक्रारदार यांचेकडून ३०,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास श्री.लक्ष्मण राठोड, पोलीस निरीक्षक, असेबी, ठाणे हे करत आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ८१०८७४०००१ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner